# पालिका प्रशासन आणि शिवसेनेच्या वादात बाळासाहेब ठाकरे मंडईचे लोकार्पण रखडले

मुंबई,रविवार (प्रतिनिधी)- जोगेश्वरी येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मंडईची इमारत गेल्या अडीच वर्षापासून वापराविना पडून आहे. प्रशासन आणि शिवसेना यांच्या वादात मंडईचे लोकार्पण रखडले आहे. आचारसंहितेपूर्वी तरी ही मंडई सुरु होणार का, असा संतप्त सवाल स्थानिकानी उपस्थित केला आहे.

ठाकरे मंडईचे २०१४ साली बांधकाम पूर्ण झाले. दहा मजल्याची ही इमारत असून मंडईतील पाच मजले पालिका कार्यालयासी तर खालील पाच मजले गाळयांसाठी राखीव ठेवले गेले आहेत. परंतु या मंडईतील गाळे मर्जीतल्या ठेकेदाराला देण्याचा घाट प्रशासनाकडून सुरू असल्याने त्यास शिवसेनेने विरोध केला आहे.यामुळे गाळयांचे वाटप अद्याप झालेले नाही. या मंडईतील गाळे मर्जीतल्या ठेकेदाराला देण्याचा घाट प्रशासनाने सुरू केल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

मंडईतील गाळे १२ कोटीला देण्यासाठी निविदा मागवल्या होत्या मात्र त्याला प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा अध्या किंमतीत निविदा मागवण्यात आल्या आहेत. मंडईतील सगळेच गाळे स्वस्तात एकाच ठेकेदाराला देण्यापेक्षा गाळयांची लॉटरी काढून महिला बचत गट व गरजूंना देण्यात यावेत अशीही मागणी शिवसेनेने केली आहे. मात्र प्रशासन आणि शिवसेना यांच्यातील वादामुळे मंडईचे लोकार्पण रखडले आहे.

## मोदींचा महापालिकेतील काळ्या बाजारावरदेखील सर्जिकल स्ट्राईक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आठ नोव्हेंबर रोजी केलेल्या आर्थिक सर्जिकल स्ट्राइकचे दूरगामी परिणाम देशात तर होतीलच त्याच बरोबर ते मुंबई महापालिकेच्या कारभारात देखील उमटणार आहेत. काळ्या पैसांविरोधातील या लढाईमुळे महापालिकेतील भ्रष्ट कारभाराला अकुंश बसेल असा अंदाज पालिका वर्तुळात वर्तवला जात आहे. सध्या तरी जनभावना मोदींच्या बाजूने असल्याने आगामी महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला फायदा मिळण्याची चिन्हे आहेत.

निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात काळा पैशांचा व्यवहार होतो असे आजवरचे वास्तव आहे. पैसा ओतल्याशिवाय निवडणुका जिंकता येत नाहीत हे उमेदवारांना माहीत असल्याने महापालिका निवडणुकात मोठ्या प्रमाणात पैशांची उलाढाल होते. मतदारांना पैशाचे व खाउचे आमिष, मद्यपार्टी असे प्रकार प्रचारादरम्यान घडविले जातात. मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रचारदेखील याला अपवाद नाही. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधानानी केलेली काळा पैसा विरोधातील लढाई महत्त्वाची ठरणार आहे.




दडवलेला पैसा (काळा) निवडणुकीच्या प्रचारादरम्यान बाहेर काढला जातो आणि त्याचे वाटप कार्यकर्ते, पैसे मिळतील या आशेने आलेले नव कार्यकर्ते यांना केले जाते. मतदानाच्या आदल्या दिवशी अनेक विभागात उमेदवारांकडून पैसे दिले जातात. या सर्व प्रकारांना चाप लागणार आहे. कारण मुंबई महापालिकेची निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये होणार आहे. याच आधी काळ्या पैशाना लगाम बसल्याने आणि आर्थिक निर्बंध असल्याने या निवडणुकांपुरता तरी काळ्या पैशांचा व्यवहार मोठ्या प्रमाणात थांबेल, अशी शक्यता आहे.

मुंबईत एक दोन पक्ष वगळता अनेक पक्षांकडे कार्यकर्त्यांची वानवा आहे. त्यामुळे गर्दी जमविण्यासाठी पैसे देवून कार्यकर्ते आणावे लागतात. या कार्यकर्त्यांना पोषणासाठी ५०० ते १००० रुपये उमेदवारांना खर्च येतो. फार पूर्वी जेव्हा निवडणुका होत होत्या तेव्हा अनेक पक्षांकडे स्वत:चे कार्यकर्ते होते. जे कोणताही मोबदला न घेता केवळ पक्ष जिंकावा या उद्देशाने कठोर मेहनत घेवून प्रचार करत. परंतु हळूहळू तो कार्यकर्ता बाजूला जावून केवळ पैशासाठी प्रचारात येणाऱ्या कार्यकर्त्यांचे महत्त्व वाढले आहे. अनेक राजकीय पक्षांचा भर देखील याच कार्यकर्त्यांवर राहिला आहे. मुंबईतील अनेक प्रभागात तर काही राजकीय पक्षांना उमेदवार मिळणे देखील कठीण होवून बसले आहे. हा संपूर्ण विचार करता पंतप्रधानांच्या या निर्णयाचा फटका त्या त्या प्रभागात जनाधार आणि कार्यकर्ता नसलेल्या राजकीय पक्षांना बसणार आहे. तेव्हा शिस्तबध्द कार्यकर्ता घडविण्याची गरज अनेक राजकीय पक्षांना असणार आहे.

फार मोठा राजकीय, चळवळीचा, आंदोलनाचा इतिहास असलेल्या एका राजकीय पक्षाची घडी मुंबईत पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. तरुणांनी देखील या पक्षाकडे पाठ फिरवली आहे. अनेक प्रभागांमध्ये त्या त्या उमेदवारास टक्कर देईल असा कार्यकर्ता देखील या पक्षाकडे नाही, अशी परिस्थिती आहे. या पक्षाला देखील पंतप्रधानांच्या निर्णयामुळे चांगले कार्यकर्ते घडविण्याची संधी चालून आली आहे. त्याचा त्यांनी पुरेपूर लाभ उठवणे जरुरीचे बनले आहे. तसे झाले तरच या पक्षाला पूर्वीच्या वैभवाचे दिवस पुन्हा मिळण्याचे भाग्य लाभेल.

मुंबई महापालिकेतील भ्रष्ट कारभार आजवर अनेक प्रकारातून लोकांसमोर आला आहे. अनेक अभियंते, अनेक अधिकारी, अनेक कंत्राटदार विविध आरोप सिध्द होवून गजाआड गेले आहेत. अनेक अधिकाऱ्यांना लाच घेताना पकडले देखील आहे. पालिका अभियंता विभाग आणि जकात नाके हे तर भ्रष्टाचाराने पुरते बदनाम झाले आहेत. येथे 'पकडला गेला तो चोर नाहीतर संन्यासी' अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आर्थिक सर्जिकल स्ट्राइकमुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांचे देखील धाबे दणाणलेले आहेत. मोठ्या रकमेच्या स्वरुपात भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून त्यांच्या वेतनाव्यतिरिक्त मिळणारी रक्कम आता काही काळापुरती तरी थांबणार आहे. तसेच त्यांनी या आधी कमावलेला काळ्या पैशाचे करायचे काय हा प्रश्नदेखील त्यांना भेडसावू लागला आहे. पैसे घेवून बेकायदेशीर रित्या काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना आता चपराक बसली आहे. असलेला काळा पैसा बाहेर काढता येत नाही आणि काढला तर कारवाईची टांगती तलवार अशी अवस्था या अधिकाऱ्यांची या निर्णयामुळे झाली असणार यात शंका नाही.

केंद्र व राज्य सरकारने निर्णय घ्यायचे आणि आपण विरोध करायचा हा नेहमीचा पायंडा शिवसेनेने यावेळी राबवला. शिवसेनेने काळ्या पैशांच्या लढाईला पाठिंबा दिला आहे, परंतु त्याचबरोबर सामान्य जनतेचा छळ थांबवा, असा इशारादेखील भाजपला दिला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांची सहानभूती मिळवण्यात आणि सरकारला पाठिंबा देण्यात शिवसेना यशस्वी झाली आहे. आगामी निवडणुकात स्वबळावर सत्ता किंवा झालाच तर निवडणुकीनंतर युती असे दोन्ही पक्षांचे धोरण राहणार आहे, अशी शंकादेखील व्यक्त केली जात आहे. तेव्हा शिवसेनेने स्वत:ची ठोस भूमिका घेवून आगामी महापालिका निवडणुकीला सामोरे जाणे हेच पक्षासाठी हिताचे ठरेल.

काळ्या पैशाविरोधात लढाई घोषित होताच आणि जुन्या नोटा सरकारी कार्यालयात ठराविक मुदतीत भरण्यासाठीचे आदेश निघताच मुंबई महापालिकेत अवघ्या दोन ते तीन दिवसात मोठ्या प्रमाणात कर जमा झाला. नागरिकांनी तातडीने मालमत्ता, पाणी आदी मिळून सुमारे ३० कोटी जमा झाले. यालाच आर्थिक सर्जिकल स्ट्राइकचा वचक असे म्हणता येईल. हाच वचक यापुढे पालिकेतील भ्रष्ट कारभारावर राहून मुंबईकराना भ्रष्टाचारमुक्त शासन देईल आणि त्यातून चांगले रस्ते, उत्तम वैद्यकीय सुविधा, अव्वल दर्जाचे शिक्षण, स्वस्त सार्वजनिक वाहतूक सेवा आदी मिळेल, अशी आशा सध्या तरी मुंबईकर जनतेच्या मनात निर्माण झाली आहे.

## बालदिना निमित्त युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते दिंडोशीतील उद्यानाचे आज लोकार्पण

मुंबई रविवार (प्रतिनिधी) - दिंडोशीती सुसज्ज उद्यान साकारले असून या उद्यानाचा लोकार्पण सोहळा उद्या सायंकाळी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे.मुंबई महानगर पालिकेच्या माध्यमातून निर्माण केलेल्या या ४००० चौरस मीटर पेक्षा मोठया उद्यानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर नव्याने विकसित केलेल्या विस्तीर्ण अशा उद्यानात मुलांना खेळण्यासाठी विविध खेळणी लावली आहेत, त्याच सोबत फिटनेस फ्रिक युवकांना मोकळ्या हवेत व्यायाम करण्यासाठी ओपन जिम देखील उभारली आहे, तसेच जॉगिंग ट्रॅकची देखील निर्मिती करण्यात आलेली आहे, जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बाके बसवली आहेत आणि कल्पवृक्ष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारळाची झाडे देखील या उद्यानात मुबलक प्रमाणात लावली आहेत, लहान मुलांना बागडण्यासाठी मोकळा भूभाग हिरवळीने आच्छादलेला आहे.

दिंडोशी विधानसभेचे स्थानिक आमदार,विभाग प्रमुख,माजी महापौर सुनिल प्रभु यांनी विधानसभा निवणुकीवेळी शिवाजी नगर, तपोवन, मालाड पूर्व येथील नागरिकांना मनोरंजनासाठी व मुलांना बागडण्यासाठी सुंदर व सुसज्ज अशा मैदानाची निर्मिती करण्याचे वचन दिले होते. तर महापालिका उद्यानासाठी राखीव असलेला भूखंड खाजगी विकासकाकडून महापालिकेच्या ताब्यात घेण्यासाठी माजी नगरसेवक गणपत वारीसे यांनी पाठपुरावा केला होता व विद्यमान नगरसेविका सायली वारीसे यांनी देखील सदर उद्यान विकसित करण्याचे वचन स्थानिक नागरिकांना दिले होते आणि त्यासाठी आमदार सुनिल प्रभु व स्थानिक नगरसेविका सायली वारीसे यांनी महापालिका अधिकाऱ्यांसोबत सतत-सातत्याने पाठपुरावा करून सुसज्ज असे उद्यान विकसित करून घेतले. बालदिनाचे औचित्य साधून, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते प्राचीन हनुमान मंदिराचे संस्थापक श्री महंत रामबालकदासजी महात्यागी यांच्या नावाने उभारलेल्या उद्यानाचा लोकार्पण सोहळा उद्या दि. १४ रोजी सायंकाळी ६ वाजता पार पडणार आहे.यावेळी आदित्य ठाकरे यांच्या हस्ते १८ युवकांना नोकरी नियुक्ती पत्र देखील देण्यात येणार आहे.

या लोकार्पण सोहळ्याला मुंबईच्या महापौर स्नेहल आंबेकर,शिवसेना नेते, खासदार गजानन कीर्तिकर,शिवसेना विभागप्रमुख आमदार सुनिल प्रभु, श्री श्री १००८ श्री महंत माधवाचार्यजी महाराज, युवासेनेचे सरचिटणीस अमोल कीर्तिकर, महिला विभाग संघटक साधना माने, आरोग्य समिती अध्यक्ष प्रशांत कदम, उपविभाग प्रमुख सुहास वाडकर, महिला विधानसभा संघटक अनघा साळकर, महिला उपविभाग संघटक पूजा चौहान, युवा-सेना निरीक्षक अंकित प्रभु यांची प्रमुख उपस्थिती असणार असल्याची माहिती माजी नगरसेवक गणपत वारीसे व शाखा प्रमुख भाई परब यांनी दिली.

## जोगेश्वरी येथे बांधण्यात येणाऱ्या पादचारी पुलाचे उद्घाटन

मुंबई, रविवार (प्रतिनिधी) - जोगेश्वरीचे फाटक ओलांडताना शेकडो नागरिकांना जिव गमवावा लागत असे.जनतेची ही गैरसोय दूर करण्यासाठी या फाटकाजवळ जोगेश्वरी पूर्व -पश्चिम येथे बांधण्यांत येणाऱ्या पादचारी पूलाचे उद्घाटन आज सकाळी राज्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री आणि जोगेश्वरी(पूर्व)चे आमदार रवींद्र वायकर यांच्या हस्ते झाले.याठिकाणी पादचारी पूल बांधण्याचे आश्वासन त्यांनी जनतेला दिले होते. आज या कामाचे भूमीपुजन करुन जोगेश्वरीतील जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केल्याचे समाधान लाभत असल्याचे मत राज्यमंत्री रविंद्र वायकर यांनी पूलाच्या भूमीपूजनावेळी व्यक्त केले.

अरविंद गंडभिर हायस्कूलमधील शिक्षिका संजीवनी वरटी यांच्या मार्गदर्शनाखाली रविंद्र वायकर व सुनिल प्रभू या लोकप्रतिनिधींनी शिक्षणाचे धडे गिरविले त्यांच्या हस्ते या पूलाच्या भूमीपुजनाचा नारळ वाढविण्यात आला.

स्थायी समितीच्या अध्यक्षपदी असताना या फाटकाजवळ पादचारी पूल बांधण्याचे आश्वासन वायकर यांनी येथील जनतेला दिले होते.त्यानुसार तब्बल १२ कोटी ६८ लाख २३ हजार ८४२ रुपयांचा प्रस्तावही तयार करण्यात आला. परंतु रेल्वेच्या हद्दीतील पूल रेल्वे प्रशासनच बांधणार असल्याचे कळविल्याने रेल्वे प्रशासनास २ कोटी ५७ लाखांचा धनादेशही पालिकेने २०११ मध्ये सुपुर्द करण्यात आला. जोपर्यंत रेल्वेवरील पूलाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत महापालिकेला आपले काम सुरू करणे शक्य होत नव्हते.रेल्वेच्या पूलाचे काम पूर्ण झाल्यावर आता या पादचारी पूलाच्या कामाचे भूमीपुजन करण्यात आले.या पुलास चढण्या व उतरण्यासाठी सरकते जीने बसविण्यात येणार असून हे काम १८ महिन्यांमध्ये पुर्ण करण्यात येणार असल्याची माहिती वायकर यांनी यावेळी दिली.

या पूलावर बसविण्यात येणाऱ्या सरकत्या जीन्यामुळे वृद्ध व अपंगाना मोठा दिलासा मिळणार आहे. या पुलाचे काम नियोजित वेळात पूर्णत्वास नेण्यासाठी जनतेने सहकार्य करावे, असे आवाहन आमदार सुनिल प्रभू यांनी यावेळी केले.

## २००० नंतरच्या झोपडयांसाठी पालिकेचे नवे 'पाणी' धोरण

मुंबई, रविवार (प्रतिनिधी) - सन २००० नंतरच्या झोपडयांसाठी मुंबई महापालिकेने पाणी पुरवठयाचे नवे धोरण आखले आहे. मात्र त्यासाठी जादा जल आकारण्यात येणार आहेत. त्यामुळे आता अनधिकृत झोपडयांनाही पाणी पुरवठा होणार असून येत्या महासभेत हे धोरण मंजुरीसाठी पटलावर ठेवले आहे.

२००० नंतरच्या झोपडयांना पाणी पुरवठा करण्यात यावा यासाठी पाणी हक्क समितीने २०१२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी होऊन अनधिकृत झोपडया हटविण्याबरोबरच त्या अस्तित्वात असेपर्यंत त्यांना पाणी पुरवठा करण्याची शासनाची जबाबदारी असल्याचे आदेश दिले होते. अधिकृत झोपडयांपेक्षा अधिक जलआकार लावण्यासंदर्भातही न्यायालयाने सूचित केले आहे. त्यामुळे २००० नंतरच्या झोपडयांना जलजोडणी देण्यासंदर्भात महापालिकेकडून धोरण आखण्यात आले आहे. तसेच काही ठिकाणी महापालिकेच्या जलवाहिन्यांचे जाळे उपलब्ध नाही तर काही ठिकाणी जलवाहिन्यांचे जाळे असले तरी पाण्याचा दाब पुरेसा नाही अशा ठिकाणी लगेच जलजोडणी देता येणार नाही असेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. त्यासाठी महापालिकेकडून काम केल्यानंतर त्यांचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

## मुंबई काँग्रेसतर्फे आज बालदिवस साजरा होणार

मुंबई, रविवार (प्रतिनिधी) - मुंबई काँग्रेसतर्फे भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्त उद्या सोमवार, १४ नोव्हेंबर रोजी बालदिवस साजरा होणार आहे. या कार्यक्रम सायंकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत मालपाणी ग्राउंड, सत्या नगर, बोरीवली पश्चिम, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात लहान मुलांसाठी मोफत फन फेअर तसेच डान्स मुंबई डान्स हि नृत्याची स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा आयोजित केलेली आहे.

चित्रकला स्पर्धा सायंकाळी ४ ते ५ या वेळेत आहे. त्यानंतर डान्स कॉम्पिटिशन सुरु होणार आहे. यामध्ये ग्रुप डान्स व सोलो डान्स अशा प्रकारची डान्स कॉम्पिटिशन आहे. तसेच लहान मुलांसाठी मोफत फन फेअरमध्ये गेम्स, पोपकोर्न व कॅन्डी देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष संजय निरुपम उपस्थित राहणार आहेत., अशी माहिती मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस भूषण पाटील यांनी दिली.

## स्थापत्य पदविकाधारक होणार जलअभियांत्रिकी सल्लागार

मुंबई, रविवार (प्रतिनिधी) - महापालिकेच्या जलअभियांत्रिकी विषयक सल्लागारांच्या किमान शैक्षणिक अहर्ता पात्रतेत बदल करण्यात आला आहे. यामुळे स्थापत्य पदविकाधारकही जलअभियांत्रिकी सल्लागार बनू शकणार आहेत.

या निर्णयामुळे जलअभियांत्रिकी सल्लागारांची संख्या वाढणार आहे. शिवाय स्पर्धात्मकता वाढून चांगली सेवा मिळले, असा विश्वास महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने व्यक्त केला आहे.

'बीएमसी लायसेन्स प्लंबर असोसिएशन' च्या शिष्टमंडळाने काही दिवसांपूर्वी महापालिका आयुक्त अजोय मेहता यांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी मांडल्या होत्या. त्यानंतर आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे. सध्या महापालिकेच्या जलअभियंता खात्याकडे १,००४ नोंदणीकृत 'नळजोडणी कारागिर' असून यापैकी १२१ व्यक्तींनी 'जलअभियांत्रिकी सल्लागार' म्हणून नोंदणी केलेली आहे.

'जलअभियांत्रिकी सल्लागार' म्हणून नोंदणी करण्यासाठी महापालिकेच्या जलअभियंता खात्याकडे 'नळजोडणी कारागिर' म्हणून नोंदणी असणे आवश्यक आहे. यासाठी नळजोडणी कारागिराकडे स्थापत्य अभियांत्रिकी या विषयाची पदवी असल्यास नोंदणी केल्यापासून ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक असणार आहे. तर नळजोडणी कारागिर स्थापत्य अभियांत्रिकी विषयातील पदविकाधारक असल्यास ७ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक असणार आहे.

## सोशल मिडीयावर बदनाम करण्याची धमकी

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - सोशल मिडीयावर बदनामीची धमकी देऊन एका सोळा वर्षांच्या मुलीकडून पैसे उकळणाऱ्या सतरा वर्षांच्या तरुणाला कुरार पोलिसांनी ताबत घेतले आहे. आरोपी तरुण अल्पवीन असलने त्याची रवानगी डोंगरीतील बालसुधारगृहात करण्यात आली आहे. सोळा वर्षांची ही मुलगी मालाडच्या मालवणी परिसरात राहते.

## जिमट्रेनर असलेल्या २० वर्षांच्या तरुणावर गोळीबार

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - जिमट्रेनर असलेल समशेर मुनीस खान नावाच्या एका २० वर्षांच्या तरुणावर काल दुपारी गोळीबार झाल्याने परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या गोळीबारात कोणीही जखमी झाला नाही. याप्रकरणी कस्तुरबा मार्ग पोलिसांनी हत्येचा गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे. कादर रेहमान शेख ऊर्फ कादर बादशाह असे आरोपीचे आहे.

## शिवसेना गोरेगांव आयोजित मोफत महाआरोग्य शिबीरात ५००० नागरिकांना मिळाला दिलासा

मुंबई रविवार (प्रतिनिधी) - गोरेगांवकरांचे आयुष्य सशक्त व निरोगी राहावे याकरिता शिवसेना गोरेगांव आयोजित आज मोफत महाआरोग्य शिबीरास ५००० नागरिकांना दिलासा मिळाला. गोरेगांव(प), मोतीलाल नगर क्र.३ येथील आझाद मैदानातील उभारलेल्या भव्य मंडपात या शिबीराचे आयोजन केले होते.या महाआरोग्य शिबीराची संकल्पना व प्रमुख आयोजक राज्याचे उद्योग मंत्री व शिवसेना नेते सुभाष देसाई यांची होती.

या शिबीराचे उद्घाटन यावेळी आमदार,विभागप्रमुख,माजी महापोर सुनील प्रभू व केईएमचे डीन डॉ.अविनाश सुपे यांच्या हस्ते आणि उद्योग मंत्र्यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी सिद्धार्थ हॉस्पिटलच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिमा पाटील, कुपरचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा बारस्कर आदी मान्यवर उपस्थित होते.

या महाआरोग्य शिबीरात नानावटी, वाडीया, केईएम, रहेजा, टाटा, सेवन हिल्स, रोटरी अशा अनेक नामांकित रूग्णालयांनी सहभाग घेतला. या शिबीराची मांडणी आठ विभागात करण्यात आली. यामध्ये बाल विभाग, महिला विभाग, सर्वसाधारण आजार, मधुमेह विभाग, हृदयरोग विभाग, कॅन्सर विभाग, नेत्रचिकीत्सा व अस्थिरोग विभाग असे आठ विभाग करण्यात आले होते. सुमारे ११७ डॉक्टर्स आणि १५० टेक्नीशियन्सनी या शिबीरात भाग घेतला.

या शिबीरात कर्करोग तपासणीत २३८ नागरिकांनी सहभाग घेतला. त्यातील ३५ नागरिकांची पुढील चाचणीसाठी टाटा कर्करोग रुग्णालयात तपासणी करण्यात येणार आहे. १४९ रूग्णांची तपासणी केली असता ७ रूग्णांची पुढील तपासणी सेवन हिल्स रूग्णालयात करण्यात येणार आहे. तर मधुमेहाची २०० नागरिकांची तपासणी केली असता ९ नागरिकांना पुढील तपासणीसाठी माहिमच्या रहेजा रूग्णालयात पाठविण्यात येणार असल्याची माहिती येथील डॉक्टरांनी दिली.

यावेळी सुदेश म्हात्रे, माजी उपविभागप्रमुख अजय नाईक, उपविभागप्रमुख शशांक कामत व दीपक सुर्वे, पी (दक्षिण) च्या प्रभाग समिती अध्यक्षा लोचना चव्हाण, गोरेगांव विधानसभा संघटक स्नेहा गोलतकर, महिला उपविभाग संघटक पूनम वैद्य व सुमंगल कोलथलकर, नगरसेवक राजू पाध्ये, नगरसेविका प्रमिला शिंदे, नगरसेविका वर्षा टेंबवलकर, माजी नगरसेवक दिलीप शिंदे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## साकिनाका सामूहिक आत्महत्येप्रकरणी आरोपी भावाला अटक

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - साकिनाका येथे काल दुपारी झालेल सामूहिक आत्महत्येप्रकरणी नरेंद्र राजाराम आणेराव या आरोपी भावाला आज सकाळी साकिनाका पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर नरेंद्रला येथील स्थानिक न्यायालयाने १७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान याच प्रकरणात मंगेशविरुद्ध त्याच्या तीन मुलींना विष पाजून त्यांची हत्या केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश धर्माधिकारी यांनी सांगितले.

पतीसह तीन मुलींची मृत्युची माहिती मिळताच मधुरा आणेराव हिला प्रचंड मानसिक धक्का बसल्याचे बोलले जाते. मधुरा मंगेश आणेराव ही महिला तिचा पती मंगेश, सात वर्षांचा मुलगा आणि तीन मुलींसोबत साकिनाका येथील मोहिली व्हिलेज, रमेश सदन चाळीतील रुम क्रमांक बारामध्ये राहते. काल सकाळी मधुरा ही तिच्या सात वर्षांच मुलाला घेऊन मिरा रोड येथील एका नातेवाईकांच्या घरी गेली होती. यावेळी घरात तिचा पती मंगेश, चार वर्षांची मुलगी हर्षदा, एक वर्षांच्या दोन जुळ्या मुली आरोही आणि अनन असे चौघेजण होते. काल सकाळी सहा ते नऊच सुमारास मंगेशने तिन्ही मुलींना विष देऊन त्यांची हत्या केली होती. नंतर त्यानेही आत्महत्या केली होती.

## विस्फोटकऐवजी बॅगेत कपडे सापडले

मुंबई, रविवार (प्रतिनिधी) - गाडी पकडण्याच्या गडबडीत सामान स्थानकातच विसरलेल्या एका महिला प्रवाशाला ते सामान सुखरूप मिळवून देण्यात पश्चिम रेल्वेच्या रेल्वे पोलीस दलाला (आरपीएफ) यश आले.

रविवारी बोरिवली रेल्वे स्थानकात दाखल झालेली गाडी क्र. १२४७१ स्वराज्य एक्स्प्रेस हातची सुटू नये, या भीतीने एका महिला प्रवाशाने आपली बॅग मागे सोडून गाडी पकडली. बराच वेळ एकाच जागी असलेल्या बॅगेवर फेरीला आलेल्या आरपीएफच्या जवानाचे लक्ष जाऊन त्यास सामान संशयित वाटले. पडताळणी केली असता विस्फोटक पदार्थाऐवजी त्या बॅगेतून केवळ महागडे कपडे सापडले. सदर बॅगेच्या मालकाला म्हणजेच महिला प्रवाशाशी संपर्क साधून बॅग त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.बोरिवली स्थानकात सकाळी ८.३० वाजता दाखल झालेल्या गाडी क्र. १२४७१ स्वराज्य एक्स्प्रेस पकडण्यासाठी महिला प्रवासी फातिमा कुर्बान हुसैन (५३) ह्या आपली बॅग प्लॅटफॉर्म क्र. ४ च्या फलाटावर विसरल्या. घाईघाईने गाडी पकडल्यानंतर आपली बॅग प्लॅटफॉर्म वरतीच विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्या दाहोदला चालल्या होत्या. दरम्यान, आरपीएफ जवान आपल्या कर्तव्यदक्षतेवर असताना प्लॅटफॉर्म वर पाहणी करतेवेळी एक बॅग निदर्शनास आली. यात एखादे विस्फोटक पदार्थ असण्याची शक्यता होती. यावेळी स्थानक वरिष्ठ निरीक्षक के.के. मीना यांनी बारकाईने बॅगेची तपासणी केली. बॅग उघडल्यावर मात्र, त्यातून किंमती महागडे कपडे आढळून आले.


### नितीन फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज लिमिटेड

नोंद. कार्यालय

८०१ आणि ८०२, सी विंग, नीळकंठ बिझनेस पार्क, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई-४०० ०८६, भारत.

दू. : +९१-२२-४०४५७०००, फॅक्स : +९१-२२-२५७०१११०, ई-मेल : nitinfire@vsnl.com वेबसाईट : http://www.nitinfire.com

सीआयएन : एल२९१९३एमएच१९९५पीएलसी०९२३२३

नितीन फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज लिमिटेड, रजि. ८०१ आणि ८०२, सी विंग, नीळकंठ बिझनेस पार्क, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई-४०० ०८६

**३०.०९.२०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षासाठी अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(प्रति शेअर माहिती सोडल्यास, रु. लाखांत)

| तपशील | अलिप्त | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही ३०.०९.२०१६ | संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०१६ | संपलेली तिमाही ३०.०९.२०१५ | संपलेली तिमाही ३०.०९.२०१६ | संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०१६ | संपलेली तिमाही ३०.०९.२०१५ |
| | अलेखापरिक्षित | | | | | |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | २९,९२८.९२ | ३७,८६०.८० | १५,९४०.०९ | ६३,२८६.८८ | ९८,३०१.१० | ४४,५६४.६६ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी) | ९६१.६० | ४०६.४४ | ६४०.५६ | ३,६२०.७४ | ६,४१७.६६ | ४,१६१.७७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | ८४६.५३ | २६०.९३ | ४१४.३६ | ३,४९३.४५ | ६,२६८.१४ | ३,९३०.०२ |
| समभाग भांडवल | ५,८४५.३९ | ५,८४५.३९ | ५,८४५.३९ | ५,८४५.३९ | ५,८४५.३९ | ५,८४५.३९ |
| राखीव (मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शवल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकित राखीव वगळून) | १०,७७०.६६ | १०,७७०.६६ | १०,२२६.८० | ५३,१२०.३७ | ५३,१२०.३७ | ३७,८४२.२१ |
| प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येकी ₹ २/-चे) (अखंडित आणि खंडित प्रवर्तनांसाठी - अवार्षिक) | | | | | | |
| मूलभूत | ०.२९ | ०.०९ | ०.१४ | १.२० | २.१४ | १.३४ |
| सौम्यिकृत | ०.२९ | ०.०९ | ०.१४ | १.२० | २.१४ | १.३४ |

**वित्तीय निष्कर्षांवरील टिपा :**

१. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अन्वये स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार मजकुराचा वरील एक उतारा आहे. तिमाही वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईट : www.bseindia.com व www.nseindia.com वर आणि कंपनीची वेबसाईट : www.nitinfire.com वर उपलब्ध आहे.

२. डिसेंबर, २०१० मध्ये वर्दिंग्टन नितीन सिलिंडर्स प्रायव्हेट लिमिटेडमधील इक्विटी स्टेक सौम्यिकृत केल्याच्या परिणामी, कंपनीने रु. ५०१.३३ लाख रकमेच्या (व्याज सोडून) एका डेरिव्हेटीव कंत्राटाचा बँकेचा थकीत दावा ताब्यात घेतला. कंपनीला कायदेशीर सल्ला मिळाला, तो असा की, सदर कंत्राट हे आरबीआय रेग्युलेशन्सचे उल्लंघन करणारे आहे आणि म्हणून, सदर दाव्यापोटी कोणतेही दायित्व अपेक्षित नाही. पुढे, कंपनीने कंत्राटाच्या वैधतेला आव्हान देणारी एक याचिका नामदार मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्या आधारे व्यवस्थापनाने हिशेब पुस्तकात कोणतीही तरतूद केलेली नाही.

३. ३०.०९.२०१६ रोजीस वर्दिंग्टन नितीन सिलिंडर्स प्रायव्हेट लिमिटेड (डब्ल्यूएनसीपीएल) च्या समभागातील रु. ४,५७८.४४ लाख ही धारण रक्कम होती. डब्ल्यूएनसीपीएलच्या बहुतांशी भागधारकांशी व्यवस्थापनाने चर्चा करून पुढचे धोरण ठरवले. गुंतवणुकींच्या धारण रकमेवर कोणतीही घट झाली नसल्याने त्यावर व्यवस्थापनाला खात्री आहे की, गुंतवणूक मूल्यात ३०.०९.२०१६ रोजी तात्पुरती घट झाली आहे. ३१ मार्च, २०१३ पासून डब्ल्यूएनसीपीएलच्या वित्तीय विवरणाच्या अनुपस्थितीमुळे, डब्ल्यूएनसीपीएलचा निष्कर्ष एकत्रिकृत अनुपालनाच्या विचारात घेतला जाणार नाही.

४. जेथे जेथे आवश्यक समजण्यात आले तेथे तेथे मागील तिमाही/वर्षांची आकडेवारी पुनर्गठीत/पुनर्रचित केली आहे.

संचालक मंडळाच्या वतीने आणि साठी
राहुल एन. शाह
पूर्ण - वेळ संचालक (डीआयएन०००७३२२६)

मुंबई
१२ नोव्हेंबर, २०१६

Building a Fire Free World"

